# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर,सदर,नागपूर

दुरध्वनी क्रमांक : २५६५१४३ फॅक्स क्रमांक : ०७१२-२५६१६६३
E-mail:ronagpur.dte@gmail.com Website:www.rdtenagpur.org.in

## गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी व प्रतिक्षा यादीसाठी जाहिरात

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांचे कार्यालय व अधिनस्त विविध शासकीय संस्थांतील व कार्यालयातील खालिल तपशिलाप्रमाणे रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून शासनाने दिलेल्या निर्देशानुसार स्पर्धा परीक्षेसाठी (लेखी परीक्षा) महाऑनलाईन, मुंबई (Mahaonline.gov.in) यांच्या मार्फत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदनाम | भरतीसाठी प्रस्तावित पदे | वेतनश्रेणी | सामाजिक व समांतर आरक्षण पदे |
|---|---|---|---|---|
| १. | वरिष्ठ लिपीक | ०२ | ५२००-२०२०० ग्रेड पे. २४००/- | खुला ०१ पद |
| | | | | खुला ०१ पद (महिला) |
| २. | **कार्यशाळा विभाग** | | | |
| अ) | कातारी | ०१ | ५२००-२०२०० ग्रेड पे २४००/- | खुला ०१ पद (प्रकल्पग्रस्त) |
| ब) | जोडारी | ०१ | ५२००-२०२०० ग्रेड पे २४००/- | अ.जा. ०१ पद ( माजी सैनिक ) |
| क) | संधाता | ०१ | ५२००-२०२०० ग्रेड पे २४००/- | इ.मा.व. ०१ पद |
| ३. | सर्वसाधारण यांत्रिकी | ०१ | ५२००-२०२००ग्रेड पे २४००/- | अ.ज. ०१ पद |
| ४. | उपकरण यांत्रिकी | ०१ | ५२००-२०२०० ग्रेड पे २४००/- | खुला ०१ पद (प्रकल्पग्रस्त) |
| ५. | विजतंत्री | ०१ | ५२००-२०२०० ग्रेड पे २४००/- | इ.मा.व ०१ पद ( माजी सैनिक ) |
| ६. | तांत्रिक प्रयोगशाळा साहाय्यक | ०५ | ५२००-२०२०० ग्रेड पे २४००/- | अ.जा. ०१ पद |
| | | | | अ.ज. ०१ पद (महिला) |
| | | | | भ.ज.क. ०१ पद (महिला) |
| | | | | इ.मा.व. ०१ पद |
| | | | | खुला ०१ पद |
| ७. | प्रयोगशाळा सहाय्यक (अंतात्रिक) | ०२ | ५२००-२०२०० ग्रेड पे २०००/- | अ.ज. ०१ पद ( अंशकालीन ) |
| | | | | खुला ०१ पद |
| ८. | सहाय्यक ग्रंथपाल | ०१ | ५२००-२०२०० ग्रेड पे २०००/- | अ.जा. ०१ पद ( महिला) |
| ९. | **गट - ड** प्रयोगशाळा परिचर | ०५ | ५२००-२०२०० ग्रेड पे १९००/- | अ.ज. ०१ पद (महिला) |
| | | | | वि.जा.अ. ०१ पद (महिला) |
| | | | | इ.मा.व ०१ पद |
| | | | | खुला ०२ पद |

**टिप : सदरच्या जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेल्या रिक्त पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. काही अपरिहार्य कारणाने परिक्षा स्थगित झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण, सामाजिक आरक्षण याबाबत बदल करणे, परिक्षा स्थगीत करणे व रद्द करणे, अशंतः बदल करणे, तसेच सेवाभरती प्रक्रियेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर हे स्वतःकडे राखून ठेवत आहेत. भरती प्रक्रिये संदर्भात उद्भवणारे वाद, तक्रारी इ.बाबत सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांचा निर्णय अंतिम राहील.**

**उपरोक्त सर्व पदासाठी आवश्यक शैक्षणिक अहर्ता, नियम व अटी यांचा सविस्तर तपशील कार्यालयाच्या www.rdtenagpur.org.in या वेबसाईटवर तसेच www.maharecruitment.mahaonline.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध राहतील.**

## उपनिर्दिष्ठ सर्व पदांसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि अन्य अटी खालीलप्रमाणे असतील.

| अ.क्र. | पदनाम | किमान शैक्षनिक अर्हता व अनुभव | परीक्षेचे स्वरुप |
|---|---|---|---|
| **संवर्ग : गट-क** | | | |
| १. | **वरिष्ठ लिपीक** (Senior Clerk) वेतनबँड रु.५२००-२०२००/- ग्रेड पे. रु.२४००/- | कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक व शासकीय/मान्यताप्राप्त कार्यालयात प्रशासकीय व लेखाविषयक कामाचा किमान एक वर्षाचा अनुभव असणे आवश्यक | लेखी परिक्षा ऑनलाईन |
| २. | **कार्यशाळा विभाग** | | |
| अ | **कातारी** (Turner) वेतनबँड रु.५२००-२०२००/- ग्रेड पे रु.२४००/- | शासनमान्य आय.टी.आय. मधील संबधीत अभ्यासक्रम उत्तीर्ण एन.सी.टी.व्ही.टी. प्रमाणपत्र उत्तीर्ण आवश्यक व तदनंतर संबंधित क्षेत्रातील एक वर्षाचा अनुभव | लेखी परीक्षा ऑनलाईन व कौशल्य चाचणी |
| ब | **जोडारी** (Fitter) वेतनबँड रु.५२००-२०२००/- ग्रेड पे रु.२४००/- | शासनमान्य आय.टी.आय. मधील संबधीत अभ्यासक्रम उत्तीर्ण एन.सी.टी.व्ही.टी. कातारी प्रमाणपत्र उत्तीर्ण आवश्यक व तदनंतर संबंधित क्षेत्रातील एक वर्षाचा अनुभव | लेखी परीक्षा ऑनलाईन व कौशल्य चाचणी |
| क | **संधाता** (Welder) वेतनबँड रु.५२००-२०२००/- ग्रेड पे रु.२४००/- | शासनमान्य आय.टी.आय. मधील संबधीत अभ्यासक्रम उत्तीर्ण एन.सी.टी.व्ही.टी. प्रमाणपत्र उत्तीर्ण आवश्यक व तदनंतर संबंधित द्य क्षेत्रातील एक वर्षाचा अनुभव | लेखी परीक्षा ऑनलाईन व कौशल्य चाचणी |
| ३. | **सर्वसाधारण यांत्रिकी** (General Mechanic) वेतनबँड रु.५२००-२०२००/- ग्रेड पे रु.२४००/- | शासनमान्य आय.टी.आय. मधील फिटर/टर्नर/मोटार मॅकेनिक अभ्यासक्रम उत्तीर्ण एन.सी.टी.व्ही.टी. प्रमाणपत्र उत्तीर्ण आवश्यक अहर्ता धारण केल्यावरचा संबंधित क्षेत्रातील दोन वर्षाचा अनुभव | लेखी परीक्षा ऑनलाईन व कौशल्य चाचणी |
| ४. | **उपकरण यांत्रिकी** (Instrument Mechanic) वेतनबँड रु.५२००-२०२००/- ग्रेड पे रु.२४००/- | शासनमान्य आय.टी.आय. मधील उपकरण यांत्रिकी अभ्यासक्रम उत्तीर्ण एन.सी.टी.व्ही.टी. प्रमाणपत्र उत्तीर्ण आवश्यक. संबंधित क्षेत्रातील कमीतकमी पाच वर्षाचा अनुभव नॅशनल अॅपरेंटिशिप प्रमाणपत्र धारकाला एक वर्षाचा अनुभव असल्यास शिथीलता. | लेखी परीक्षा ऑनलाईन व कौशल्य चाचणी |
| ५. | **विजंतत्री** (Electrician) वेतनबँड रु.५२००-२०२००/- ग्रेड पे रु.२४००/- | मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) उत्तीर्ण व शासनमान्य आय.टी.आय. विजतंत्री ट्रेड उत्तीर्ण किंवा सार्वजनिक बांधकाम अनुज्ञापक प्राधिकरण (Licensing Authority) यांनी निर्गमित केलेले प्रथमश्रेणी पर्यवेक्षक प्रमाणपत्र किंवा उच्च अर्हताधारक व वरील अर्हताधारण केल्यानंतरचा किमान एक वर्षाचा अनुभव. | लेखी परीक्षा ऑनलाईन व कौशल्य चाचणी |
| ६. | **तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक** (Technical Lab Assistant) वेतनबँड रु.५२००-२०२००/- ग्रेड पे रु.२४००/- | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे किंवा शासनमान्य संस्थेतील अभियांत्रिकी शाखेतील तीन वर्षीय पदविका (Engineering and Technology) उत्तीर्ण व संबंधीत क्षेत्रातील अहर्ता धारण केल्यावरचा एक वर्षाचा प्रयोगशाळा सहाय्यक मॅन्यूफ्रॅक्चरींग/सर्व्हिसिंग/मेटेनन्स/डिझाईन /सी.एन.सी.मशीन हाताळण्यांचा अनुभव (अणुविद्युत/संगणक/माहिती तंत्रज्ञान/स्थापत्य/विद्युत/यंत्र शाखेतील पदविका असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य) | लेखी परीक्षा ऑनलाईन |
| ७. | **प्रयोगशाळा सहाय्यक (अंतात्रिक)** (Lab Assistant) वेतनबँड रु.५२००-२०२००/- ग्रेड पे रु.२०००/- | मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (SSC) उत्तीर्ण. २. प्रयोगशाळेतील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | लेखी परीक्षा ऑनलाईन |
| ८ | **सहाय्यक ग्रंथपाल** (Assistant Librarian) वेतनबँड रु.५२००-२०२००/- ग्रेड पे रु.२०००/- | १.मान्यता शैक्षणिक संस्थेमधून माध्यमिक शालांत प्रमानपत्र परिक्षा (SSC) उत्तीर्ण. २. शासन मान्यता प्राप्त संस्थेतधून ग्रंथालय प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण किंवा डी.लिब. किंवा बी.लिब. ३. ग्रंथालयामधील एक वर्षाचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव. | लेखी परीक्षा ऑनलाईन |
| ९ | **(गट – ड)** **प्रयोगशाळा परिचर** (Lab Attendent) वेतनबँड रु.५२००-२०२००/- ग्रेड पे रु.१९००/- | शासन मान्य शिक्षण संस्थेतून इयत्ता सातवा वर्ग उत्तीर्ण असणे आवश्यक. तसेच प्रयोगशाळेत काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य. | लेखी परीक्षा (ऑफलाईन) |

**कमाल व किमान वयोमर्यादा (दि.०१/०१/२०१७ रोजी)**

१. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी किमान १८ व कमाल ३८ वर्ष
२. मागास प्रवर्गासाठी किमान १८ व कमाल ४३ वर्ष.
३. प्रकल्पक्रस्त / भूकंपग्रस्त / अपंग उमेदवारांसाठी ४५ वर्ष.
४. अच्युत्त गुणवत्ताधारक खेळाडू कमाल ४३ (सर्वसाधारण) व मागासवर्गीय खेळाडू कमाल ४८ वर्ष
५. भूदल, हवाईदल किंवा नाविक दल सेवेमध्ये सहा महिने व त्यापेक्षा अधिक सेवा केली असेल तर संरक्षण सेवेमध्ये केलेली एकूण सेवा अधिक तीन वर्ष हा कालावधी माजी सैनिकांचे वय मोजताना कमी केला जाईल.

६. स्वातंत्र सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, जनगणना कर्मचारी व सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी यांना ४५ वर्ष.

७. अंशकालीन पदवीधर अमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ४६ वर्ष.

८. शासनाच्या सेवेतील कर्मच्यान्यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही. ( वयाच्या ५० वर्षापर्यंत)

## सर्वसाधारण सूचना व अटी :

०१. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा.

अ) उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला सादर करणे आवश्यक राहील.

ब) सदर उमेदवाराकाडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्मतारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक राहील.

क) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या उमेदवारांसाठी लागू राहतील. इतर उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहिल.

०२. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

०३. प्राथमिक छाननी अंती ज्या उमेदवारांचा अर्ज नाकारण्यात आलेले नाहीत अश्या उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी तात्पूरता प्रवेश दिला जाईल.

०४. मागासवर्गीय प्रवर्गातील आरक्षण हे महाराष्ट्र राज्याच्या अधिनिवासी उमेदवारापुरते मर्यादित राहील. आरक्षीत मागास प्रवर्गाचा दावा करणान्या उमेदवारांना त्यासंदर्भातील सक्षम अधिकान्यांनी दिलेले जात प्रमाणपत्र (Caste Certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची (Caste Validity Certificate) साक्षांकित प्रत कागदपत्रे पडताळणीच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील.

०५. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास महाराष्ट्र शासन प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीसी:२०११/ प्र.क्र.१०६४/२०१११६ व दि.१२.१२.२०११ मधील तरतुदीनुसार याचिका क्रमांक २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२५.०८.२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून, तात्पूरती नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पूर्वलक्षीपणे रद्द करण्यांत येईल.

**०६. जाहीरातीतील सर्व पदांसाठी लेखी परीक्षा अनिवार्य आहे, उमेदवारांना मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.**

अ) वरिष्ठ लिपीक , प्रयोगशाळा सहाय्यक, सहाय्यक ग्रंथपाल या पदांकरीता लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, अंकगणित, संगणक, विभागाची माहिती व विषयाची माहिती यावर आधारीत प्रश्नांकरीता समान गुण ठेऊन २०० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी ऑनलाईन परीक्षा घेण्यात येईल व त्याआधारे गुणवत्तेनुसार निवड केली जाईल.

ब) कार्यशाळा विभाग (कातारी, जोडारी, संधाता), सर्वसाधारण यांत्रिकी, उपकरण यांत्रिकी, विजतंत्री या पदांकरीता लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, अंकगणित व विभागाची माहिती या विषयांवरील प्रश्नांकरीता समान गुण ठेऊन १२० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी ऑनलाईन परीक्षा व ८० गुणाची प्रात्याक्षिक परिक्षा घेण्यात येईल व त्याआधारे गुणवत्तेनुसार निवड केली जाईल.

क) तांत्रिक प्रयोगशाळा साहाय्यक या पदांकरीता लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, अंकगणित व विभागाची माहिती तांत्रिक व अभियांत्रिकी प्रश्नावर अधारीत विषयांवरील प्रश्नांकरीता समान गुण ठेऊन २०० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी ऑनलाईन परीक्षा घेण्यात येईल व त्याआधारे गुणवत्तेनुसार निवड केली जाईल.

ड) गट ड अंतर्गत प्रयोगशाळा परिचर या पदांकरीता मराठी, सामान्य ज्ञान, भौगोलिक ज्ञान इ. विषयावरील प्रश्नांकरीता समान गुण ठेऊन १०० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी लेखी परीक्षा घेण्यात येईल.

या पदांकरीता जे उमेदवार लेखी परीक्षेत ४५ टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळवितील तसेच नियुक्तीसाठी पात्र असतील. गुणांच्या गुणवत्तेनुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार केली जाईल.

प्रयोगशाळा परिचर या पदांकरीता जे उमेदवार लेखी परीक्षेत ४५ टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळवितील तसेच उमेदवार नियुक्तीसाठी पात्र असतील. गुणांच्या गुणवत्तेनुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार केली जाईल.

**उमेदवारांना लेखी परीक्षा / कौशल्य चाचणी / यासाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. चाचणीस गैरहजर राहील्यास उमेदवार अंतिम निवडीसाठी अपात्र ठरेल.**

०७. सर्व प्रवर्गातील उमेदवारांना लेखी परीक्षा, कौशल्य चाचणीसाठी बोलाविलेल्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. परीक्षा नागपूर येथे घेण्यात येईल.

०८. लेखी परीक्षेमध्ये फक्त काळया / निळया शाईच्या बॉलपेनचा वापर करणे बंधनकारक आहे.

०९. पद भरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये. एखाद्या अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविले जाईल.

१०. निवड प्रक्रियेदरम्यान व तदनंतर उमेदवारांनी सादर केलेली प्रमाणपत्रे संशयास्पद वा अयोग्य / अपर्याप्त आढळल्यास उमेदवारांची निवड / नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द केली जाईल.

११. उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

१२. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि.१६.०३.१९९९ अन्वये समांतर आरक्षणातील प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध झाले नाही तर सामाजिक आरक्षणातील त्या त्या प्रवर्गातील उमेदवाराची निवड करण्यांत येईल. समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षण अंतर्गत आरक्षण असल्याने त्यास सामाजिक आरक्षणावर वाढीव म्हणून गणण्यात येणार नाही. सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडील पत्र क्र.पअंक - .१०१०/७१७/प्र.क्र.३२२/१०/१६अ, दि.२६ ऑगस्ट, २०१० पत्रान्वये एकदा नोकरी मिळाल्यानंतर पुन्हा दुसऱ्या पदावर नोकरी मिळण्यासाठी त्यास समांतर आरक्षणाचा लाभ देणे शासन धोरणाशी विसंगत आहे. एकदा उमेदवाराने समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्या उमेदवारास पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ देता येणार नाही.

१३. गट-क पदांकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संगणक हाताळणी / वापराबाबतचे पुढे नमूद केलेले प्रमाणपत्र नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षाच्या आंत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा त्याची सेवा समाप्त होईल. D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

१४. शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला तसेच जातीचा दाखला उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र अज/अजा उमेदवार / अर्जदार वगळून इतरांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत इ. प्रमाणपत्रांच्या साक्षांकित व मूळ प्रतीत, कागदपत्रे तपासणीच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे.

१५. साक्षांकित प्रती केंद्र/राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोष्ट मास्तर, मुख्याध्यापक व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिकाऱ्यांनीच केले असावे. तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारला जाईल.

**१६. शासकीय / निमशासकीय सेवेतील संबंधित प्रवर्गातील कर्मचाऱ्यांनी ना-हरकत प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील.**

१७. जाहिरातीमधील पदासाठी अर्ज करणाऱ्या विवाहित उमेदवारांनी त्यांच्या अर्जासोबत शासन अधिसूचना एसआरव्ही-२०००/प्र.क्र.(१७/२०००)/बारा, दिनांक २८/०३/२००५ नुसार नमुना "अ" नियम ४ प्रमाणे लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र कागदपत्रे पडताळणीच्या वेळेस सादर करणे बंधनकारक राहील, सदरचे प्रतिज्ञापत्र प्राप्त न झाल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज रद्द करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

१८. शासन निर्णय क्रमांक : अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोंबर २००५ मधील तरतुदींनुसार नियुक्तीसाठी निवड झालेल्या उमेदवारांना नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहिल.

१९. वित्त विभाग परिपत्रक क्रमांक अनियो १००५/१२६/सेवा-४, दिनांक १२ जानेवारी २००७ व वित्त विभाग परिपत्रक अनियो १००९/१३/सेवा-४, दिनांक २४ फेब्रुवारी २००९ मधील सर्व अटींची पुर्तता होत असल्यासच **शासकीय कर्मचाऱ्यास** महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु राहील.

२०. अजा, अज प्रवर्ग वगळून सर्व प्रवर्गातील उमेदवारांनी समाजाच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे **(नॉन क्रिमिलेअर)** दिनांक ३१/०३/२०१६ पर्यंतचे वैध असलेले प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे, अन्यथा त्यांचा आरक्षित पदासाठी विचार केला जाणार नाही.

२१. रोजगार व स्वयंरोजगार विभाग अथवा अन्य अधिकृत विभागाकडे नोंदणी केली असल्यास अद्ययावत नोंद पत्राची छायांकित प्रत सादर करणे बंधनकारक राहील.

२२. जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे पात्रताधारक असल्याची खात्री करुनच उमेदवाराने अर्ज करावे.

२३. ज्या अपंग उमेदवारास लेखनिक नियमानुसार अनुज्ञेय आहे, अशा उमेदवाराने लेखनिकाची व्यवस्था स्वत: करावी व लेखनीक संबंधित पदाच्या किमान शैक्षणिक अर्हतेपेक्षा एक इयत्ता कमी शिकलेला असावा.

२४. अपंग उमेदवारांकरीता जिल्हा शल्य चिकित्सक यांनी निर्गमित केलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र ४० टक्के पेक्षा कमी नसावे,.

२५. महिला आरक्षणासाठी महिला उमेदवार न मिळाल्यास त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमधून पदे भरण्यात येतील. महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग ८२/२००१ म.से.आ.-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दि.२५/०५/२००१ मधिल तरतुदींनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत

नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे दिनांक ३१/०३/२०१६ या दिनांकापर्यंत वैध असलेल्या नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र इ. कागदपत्रे पडताळणीचे वेळेस सादर करणे आवश्यक आहे.

२६. खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षित पदासाठी जर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी अर्ज केल्यास त्यांना सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले जात व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अशा महिला उमेदवारांनी खुल्या प्रवर्गातील महिलांप्रमाणेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे दिनांक ३१/०३/२०१६ पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

२७. अनुभवाच्या बाबतीत तासिका, नियतकालिक, अर्धवेळ, विद्यावेतन, अभ्यागत, विनावेतन तत्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही, अंशकालीन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे व तसे केल्याचे पुरावे कागदपत्रे पडताळणीच्या वेळेस सादर करणे बंधनकारक राहील.

२८. अंतरिम निवड यादी मधील पात्र उमेदवारांच्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मूळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासणीच्या वेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती (Original Copy) कागदपत्रे तपासणीच्यावेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारावर बंधनकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे उपलब्ध करुन न दिल्यास तसेच खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल. तसेच निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनांस आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल / शासकीय सेवेत असल्यास बडतर्फ करण्यात येईल.

२९. निवड झालेल्या उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे वेतन व भत्ते लागू राहतील.

३०. **प्रक्रिया व परीक्षा शुल्क** : गट क ऑनलाईन परिक्षेकरीता परीक्षा शुल्क :- (१) अमागास :- ५५०/- (२) मागास :- ४५०/- गट "ड" ऑफलाईन परिक्षेकरीता करीता सर्वसाधारण (खुल्या प्रवर्गातील) उमेदवारांसाठी परीक्षा शुल्क ३००/- (रुपये तिनशे फक्त) व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रुपये १५०/- (रुपये एकशे पन्नास फक्त) परीक्षा शुल्क असून आवश्यक परीक्षा शुल्क डेबिट / क्रेडीट कार्ड किंवा महाऑनलाईन संकेत स्थळावरुन प्राप्त चलनाद्वारे State Bank of India च्या कुठल्याही शाखेत भरावी.

उमेदवारास एका पदापेक्षा जास्त पदासाठी अर्ज करायचा असल्यास, प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा लागेल व त्यासाठी स्वतंत्र भरतीप्रक्रिया शुल्क भरावे लागेल. सदर **परीक्षा शुल्क हे ना-परतावा राहील.** ( माजी सैनिकांना अर्जासोबत भरतीप्रक्रिया शुल्क भरण्याची आवश्यकता नाही, मात्र त्यासाठी त्यांनी सैनिकी सेवेचा पदावधी पूर्ण केल्याबाबतच्या कार्यमुक्त पत्राची साक्षांकित छायाकिंत प्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. )

३१. अर्ज करण्याची पध्दत :

- प्रस्तुत परिक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने दि.०३.०१.२०१७ पर्यंत स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.
- पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज दिनांक २०.१२.२०१६ ते दिनांक ०३.०१.२०१७ या कालावधीतच http://maharecruitment.mahaonline.gov.in याा या संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक राहील.
- http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या "सर्वसाधारण सुचना" उपलब्ध आहेत. त्याचे काळजीपुर्वक वाचन करुन ऑनलाईन अर्ज सादर करावा.
- उमेदवाराने जाहीरात व सर्वसाधारण सुचना काळजीपुर्वक वाचाव्यात. ऑनलाईन अर्ज करण्यासाठी उपरोक्त संकेतस्थळावर "Apply Online" या लिंकवर क्लिक करुन सर्वप्रथम प्राथमिक माहिती भरावी. यानंतर रजिस्टर (Ragister) या बटनावर लिंकवर क्लिक करुन अर्जाची नोंदणी करावी. अर्ज इंग्रजी मध्ये भरणे आवश्यक आहे. आवश्यक माहिती भरल्यानंतर नोंदणी झाल्यावर संगणक प्रणाली तुमचा लॉगीन आयडी आणि पासवर्ड निर्माण करुन तुम्हाला तुमच्या स्क्रिनवर दाखवेल. याची प्रिंट काढण्यासाठी सुविधाही उपलब्ध आहे.

  ऑनलाईन पध्दतीने अर्ज करतांना उमेदवाराने स्वतःचे अद्यावत फोटो (रुंदी ३.० से.मी. X उंची २.५ से.मी.) आणि ३०० DPI Resoluation आणि 50KB पेक्षा कमी साईज होईल अशा विहीत पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे. (टिप :- फोटो स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवाराने त्यांचाच फोटो व स्वाक्षरी अपलोड झाल्याची खात्री करावी) प्रवेशपत्रावर / अर्जावर दुसऱ्याचा फोटो / स्वाक्षरी असल्यास उमेदवारास निवडीच्या टंप्प्यामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

  ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याच्या सुचना http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील. अर्ज ऑनलाईन अथवा महा-ई सेवा केंद्रा द्वारे भरता येईल. महा ऑनलाईन लि. या संस्थेकडून प्रत्येक जिल्ह्यात महा-ई सेवा केंद्र उघडण्यात आलेले आहे. या महा-ई सेवा केंद्राची यादी http://mahaonline.gov.in किंवा http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उमेदवाराने यापुर्वी http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर आपले खाते तयार केले नसल्यास उमेदवारास "नविन वापर करता नोंदणी" वर क्लिक करुन युझर नेम पासवर्ड तयार करावा लागेल.

त्यानंतर उमेदवाराने "प्रोफाईल निर्गीती" मध्ये जाऊन स्वतःची संपुर्ण माहिती भरावी लागेल http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर या पुर्वी प्रोफाईल निर्मीती मध्ये जाऊन स्वतःची माहिती भरलेली असल्यास पुन्हा भरावयाची आवश्यकता नाही. उमेदवार स्वतःची प्रोफाईल माहिती कधीही अद्यावत करु शकतो.

उमेदवाराने युजर नेम व पासवर्डची नोंद करुन लॉग इन केल्यानंतर अर्ज सादर करावयाच्या कार्यालयाच्या लिंक वर क्लिक करावे. त्या कार्यालयांतर्गत उपलब्ध जाहिराती "अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा." या संदेशासह दाखविल्या जातील.

क्लिक केल्यानंतर आपन जाहीरातीत नमूद शैक्षणिक पात्रता/ अनुभव/ इतर बाबीची पुर्तता करीत असल्यास आपला अर्ज स्विकारल्या जाईल, अन्यथा आपला अर्ज दाखल न होण्याचे कारण दाखविले जाईल.

ज्या उमेदवारांना इंटरनेट द्वारे स्वतःचे अर्ज भरावयाचे नसेल, असे उमेदवार महा इ-सेवा केंद्रा मार्फत आपला अर्ज करु शकतात. त्याच वेळी उमेदवाराकडून परिक्षा शुल्क व सेवाशुल्क ऐवढी रक्कम घेतली जाईल. उमेदवारांना पैसे भरण्याची पावती (Receipt) महा इ-सेवा केद्रातर्फे देण्यात येईल. या सुविधेमध्ये आवेदन अर्ज भरणे व पैसे भरल्यानंतर पैसे भरल्याची पावती देणे याचा समावेश असेल. फोटो / स्वाक्षरी किंवा अर्जाची प्रिंट करीता स्वतंत्र रक्कम केंद्र चालकाकडून आकारली जाईल. स्वतः ऑनालाईन पध्दतीने अर्ज सादर करणारे उमेदवार कार्यालयाने निश्चित केलेले परिक्षा शुल्क खालील पध्दतीने भरतील.

**३२. परिक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता उमेदवारांनी खालील नमूद केलेलया पध्दतीचा अवलंब करावा.**

१. भरतीय स्टेट बँकेत चलनाद्वारे (२) नेट बँकींग (३) डेबीट काड (४) क्रेडीट कार्ड.
परिक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पध्दतीचा अवलंब करावा.

२. युजरनेम व पासर्वडची नोंद करुन लॉग ईन केल्यानंतर मुख्य पृष्ठाच्या वरील भागातील "माझे खाते" या लिंकवर क्लिक करावे. (२) गाझे खाते या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या कार्यालयाची नाव निवडल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदाची यादी शुल्क भरल्याच्या/ न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर "Unpaid" असे लिहीलेले असेल, त्या ठीकाणी "Pay now" अशी लिंक उपलब्ध असेल. (३) "Pay now" या लिंकवर क्लिक केल्यानंतर दोन पर्याय उपलब्ध होतील. (१) ऑनलाईन पेमेंट (२) चलनाद्वारे (३) उमेदवाराचे क्रडीट कार्ड, डेबीट कार्ड, अथवा नेट बँकींगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील. उपरोक्त कार्यवाही , अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापुर्वी पुर्ण करणे आवश्यक राहील. (५) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणाऱ्या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. (६) चलनाद्वारे शुल्क स्विकारण्याकरीता भारतीय स्टेट बँक उमेदवाराकडून परीक्षा शुल्का व्यतिरीक्त नियमानुसार सेवा शुल्क आकारेल. अशा प्रकारे उमेदवारास चलनाद्वारे शुल्क भरतांना परिक्षा शुल्क + बँकेचे सेवा शुल्क भरावे लागतील. (७) ज्या उमेदवाराने भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे. असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारानी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

३. उमेदवाराने प्रिंट चलन (Print Challan) या बटनावर क्लिक करुन चलन प्रिंट करावे. या प्रिंट केलेल्या चलनावर उमेदवाराने त्याच्या प्रवर्गानुसार परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडीया या बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी वरीलप्रमाणे नमूद केलेल्या विहीत मुदतीच्या आत भरणे आवश्यक राहील. अर्ज भरल्यानंतर दोन तासांनी शुल्क भरता येईल. याची एक प्रत उमेदवाराने स्वतःकडे जपून ठेवावी. किंवा

किंवा

४. उमेदवाराने इंटरनेट बँकींग अथवा क्रेडीट / डेबीट कार्ड द्वारे त्यांच्या प्रवर्गानुसार परीक्षा शुल्क विहीत मुदतीच्या आत भरावे.

५. फी भरल्यानंतर उमेदवाराने "अर्ज भरा" या लिंकवर क्लिक करुन, आपला उर्वरीत अर्ज भरुन पुर्ण करावा. अर्ज भरताना उमेदवाराने स्वतःचा पासपोर्ट साईजमधील फोटो व सही अपालेड करणे आवश्यक आहे. माहिती पुर्ण भरल्यानंतर उमेदवाराने अर्जाची प्रिंट स्वतः काढावी व कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करण्यासाठी जतन करुन ठेवावी.

६. विहीत मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जानार नाही.

७. उमेदवाराची परीक्षा / व्यावसाईक परीक्षेचे ठीकाण निश्चित झाल्यानंतर परिक्षेपुर्वी सात दिवस अगोदर उमेदवारास प्रवेश पत्र "माझे खाते" मध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपुर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

८. विहीत मुदतीत अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची कार्यवाही, तसेच भारतीय स्टेट बॅकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास ऑन लाईन चलनाची प्रत प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही दि. ०३.०१.२०१७ रात्री १२ वाजेपर्यंत पुर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

९. चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बॅकेमध्ये दि. ०४.०१.२०१७ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहीत दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जानार नाही. तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जानार नाही.

१०. वरील सर्व प्रक्रिया पुर्ण केल्यानंतरच उमेदवार परीक्षा देण्यासाठी पात्र होईल. उमेदवाराच्या माहिती व मदतीकरीता मे. महाऑनलाईन, लि. मुंबई च्या कॉल सेंटरवरील उपलब्ध दुरध्वनी क्रमांकावर किंवा संकेतस्थळावरील फिडबॅकच्या सुविधेद्वारे योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध होईल.

११. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना स्वतःच्या मोबाईल नंबर व ई-मेल आयडी काळजीपुर्वक भरावा.

**<u>ऑनलाईन अर्ज पूर्ण भरल्यानंतर अर्जाची प्रत तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर कार्यालयाला किंवा मे. महाऑनलाईन मुंबई</u>** (Maha Recruitment Mahaonline. Mumbai) **<u>यांना पाठविण्याची आवश्यकता नाही.</u>**

अर्जदाराने नियमितपणे वेबसाईट चेक करावी.

३३. पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणाऱ्या व लेखी परीक्षेस पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक इ. बाबतची माहिती http:// Mahaonline. Gov.in वर उपलब्ध राहील. या प्रक्रियेच्या अनुषंगाने कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

३४. **जिल्हा रोजगार व स्वयं रोजगार, मार्गदर्शन केंद्र व आदिवासी विकास विभागाकडे नाव नोंदणी केली असली तरी वरिल पदासाठी स्वतंत्रपणे रितसर <u>Online</u> अर्ज करणे आवश्यक आहे.** नाव नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित केलेली प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे.

३५. उमेदवारांनी अर्जासोबत माहिती सादर करताना सतत कार्यान्वित असलेल्या भ्रमणध्वनी (Mobile) क्रमांक व ई मेल आयडी नमुद करावा. जेणेकरुन आपणांस संपर्क करुन आवश्यक ती माहिती देणे सुलभ होईल.

३६. शासन निर्णय क्र. प्रानिमं/-१२१५/(प्र.क.५५/१५)/१३-अ, दिनांक ०५/१०/२०१५ अन्वये एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास खालील प्राध्यान्य क्रमाच्या आधारे उमेदवाराची गुणवत्ता यादी तयार करुन अंतिम निवड करण्यात येईल.

अ) वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

ब) समान वय असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतर शैक्षणिक अर्हता ( पदव्युत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे) धारण करणा-या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

क) वरील दोन्ही अटीमध्ये समान ठरत असलेल्या उमेदवाराच्या बाबतीत, सदर पदाकरीता आवश्यक असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती विभागात कोठेही करण्यात येईल व तो बदलीस पात्र राहील.

३७. ऑनलाईन अर्जामध्ये माहीती भरत असतांना काही अडचणी निर्माण झाल्यास मुख्यपरीचलन अधिकारी महाऑनलाईन, मुंबई यांचेशी दुरध्वनीवरुन संपर्क साधावा –०२२ ६१३१६४०३

३८. परिक्षा केंद्र :-

- प्रत्यक्ष परीक्षा केंद्र उमेदवारांना त्याचे प्रवेश पत्रिकेवर नमुद करण्यात येईल.
- प्रस्तुत परीक्षेपुर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशपत्रावर नमुद केलेल्या संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घेता येईल. सदर प्रवेशपत्र उमेदवाराने परीक्षेच्या वेळी सादर करणे अनिवार्य आहे.
- परीक्षेच्या वेळी उमेदवाराने उपरोक्त प्रवेश प्रमाणपत्र आणणे अनिवार्य आहे. उमेदवाराने प्रवेशपत्राशिवाय स्वतःचे छायाचित्र असलेले ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील. (उदा. आधार कार्ड, पॅन कार्ड, निवडणूक आळखपत्र, वाहण चालविण्याचा परवाना इ. )

३९. **विशेष सुचना** :-

- हॉल तिकीट उमेदवाराने स्वतः डाऊनलोड करावयाचे आहे.
- ऑनलाईन स्वरुपात निर्देशित परीक्षा केंद्रावरच परीक्षा होईल.
- हॉल तिकीटावर परिक्षा केंद्र व वेळ नमूद राहील.
- उमेदवारांना महा ऑनलाईन साईटवर मॉक टेस्ट (Mock Test) साठी एक लिंक पुरविण्यात येईल त्यांनी परिक्षेचा सराव करावा.

- उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेची प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका परिक्षेनंतर त्यांच्या ई-मेल वर पाठविण्यात येईल. प्रश्नपत्रिका किंवा उत्तरपत्रिकेसंबंधी काही शंका/त्रुटी असल्यास महाऑनलाईनच्या वेबसाईटवर ४८ तासामध्ये पाठविण्यांत यावा.

**महत्वाच्या तारखा :**

| | | |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज सुरु होण्याचा दिनांक | २०.१२.२०१६ |
| २ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | ०३.०१.२०१७ |
| ३ | संगणकीय चलनाद्वारे स्टेट बॅक ऑफ इंडिया यांच्या शाखेमध्ये फी स्विकृतीचा कालावधी | ०४.०१.२०१७ |
| ४ | परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा संभाव्य दिनांक | १६.०१.२०१७ |
| ५ | ऑनलाईन परीक्षेचा संभाव्य दिनांक | २४ व २५.०१.२०१७ |
| ७ | प्रात्याक्षिक परीक्षेकरीता संभाव्य दिनांक | ०४.०२.२०१७ |
| ६ | ऑफलाईन परीक्षेकरीता संभाव्य दिनांक (वर्ग ४ च्या पदाकरीता) | २१.०१.२०१७ |

**टिप्पणी :** अर्ज भरण्यापूर्वी अर्जदाराने जाहिरातीत नमुद केलेल्या सर्व आवश्यक अर्हता आपण पूर्ण करत आहोत का ? याची खात्री करुन घ्यावी. कार्यालय,उमेदवार निवडी करीता पात्र असल्यानंतरच मूळ दस्तऐवजा संदर्भातील अर्हतेच्या अटींची पडताळणी करेल. या जाहिरातीत नमूद करण्यांत आलेल्या विहित आवश्यक अर्हतेच्या पूर्तीच्या अधीन राहून उमेदवाराचा भरती प्रक्रियेमधील प्रवेश पूर्णतः तात्पुरता असेल.

दिनांक: २०.१२.२०१६

स्वा/-

**सहसंचालक,**

**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर**